माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ नियम क्रमांक ४(१)(ख) प्रमाणे पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड कार्यालयाची (०१ ते १७) मुद्दयांची माहिती

नियम क्र. ४(१)(ख) (एक)

आपली रचना,कार्य,व कर्तव्य यांचा तपशिल:-

रचना :-सदरचे कार्यालय कार्यरत असुन - १५ ऑगस्ट २०१८ मध्ये पोलीस आयुक्त कार्यालयाचे विभाजन होवून स्वतंत्र कार्यालय स्थापन झाले. महानगर पालिकेकडुन भाडेतत्वावर पुरवलेली नविन इमारतीमध्ये ०१ जानेवारी २०१९ पासुन पोलीस आयुक्तालयाचे कामकाज सुरू झाले. या कार्यालयाचे अधिपत्याखाली एकुण ०४ परिमंडळ असुन २५ पोलीस स्टेशन कार्यरत आहे.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

कार्यालयाचे नाव	:-	पोलीस आयुक्त कार्यालय पिंपरी चिंचवड
कार्यालयाचा पत्ता	:-	पोलीस आयुक्त कार्यालय,पिंपरी चिंचवड, प्रेमलोक पार्क चिंचवड,पुणे – ४११०३३
पोलीस आयुक्त	:-	श्री विनयकुमार चौबे
वास्तव मालमत्ता	:-	महानगरपालिकेडुन भाडे तत्वावर पुरवलेली इमारत
कोणत्या खात्याअंतर्गत कार्यालय आहे	:-	गृह विभाग, पोलीस खाते, पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई
कार्यकक्षा /भौगोलीक हद्द	:-	पिंपरी चिंचवड आयुक्तालया अंतर्गत येणारी २५ पोलीस ठाणे
अंगीकृत व्रत	:-	ध्येय्य वचन

- **प्रत्येक** नागरिकाच्या सुरक्षिततेसाठी तसेच त्यांच्या न्याय्य हक्कांच्या रक्षणासाठी पिंपरी चिंचवड पोलीस कटिबध्द आहेत.
- **भीती** किंवा प्रलोभनाला बळी न पडता या देशांच्या कायदयावर कसोशीने अंमलबजावणी करण्याचा आमचा संकल्प आहे.
- **सदरक्षणाय खलनिग्रहणाय** या महाराष्ट्र पोलीस यांच्या ब्रीदवाक्याला स्मरुन आम्ही समाजातील सद्प्रवृत्तीचे रक्षण तसेच अपप्रवृत्तींवर अंकुश ठेवण्याचा सतत प्रयत्न करु.
- **कायदे व नियमांचे** पालन करुन आपण आमच्या या प्रयत्नांना साथ दयावी ही विनंती आपल्या एकत्रित प्रयत्नांमधून पिंपरी चिंचवड सुरक्षित आणि समृध्द बनेल याची मला खात्री वाटते.
- **पिंपरी चिंचवड** कायदयाचे राज्य अबाधित राखीव, कायदयाची ठाम व निःपक्षपातीपणे अंमलबजावणी करील प्रगती व समृध्दीसाठी पोषक असे भयमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी कटीबध्द राहील.
- **सार्वजनीक सुव्यवस्था** राखण्यासाठी बांधील राहुन गुन्हयांना चा प्रतिबंध करुन त्यांचा तत्परतेने शोध लावेल. जातीय सलोखा राखुन तो वृध्दीगत करील आणि समाज विघातक प्रवृत्ती व अवैध कृत्याविरुध्द कठोर कारवाई करेल.
- **आम्ही** समाजातील सर्व घटकांची आणि विशेषतः दलित, दुर्बल स्त्रिया, अल्पसंख्यांक , गरीब आणि वंचीत घटकांची मनोभावे सेवा करु व त्यांना उचित संरक्षण प्रदान करुन आपत्तीग्रस्त नागरिकांचे मदतीस ख-या सेवाभावी वृत्तीने व सहृदयतेने तत्पर प्रतिसाद देवू.
- **आम्ही** आमचे वैयक्तीक जिवनात उच्च प्रतीच्या सचोटीने आचरण करु. पोलीस दलास भ्रष्टाचार मुक्त व पारदर्शी करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहु.
- **संरक्षीत व सुखकर** पिंपरी चिंचवड हा आमचा संकल्प आहे. हा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करू.
- **ध्येय्य /धोरणे :-** सदरक्षणाय खलनिग्रहणाय, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे.,शासनाने निर्धारीत केलेले नियम/आदेश/सुचनांचे पालन करणे.
- **साध्य:-** जनतेचे जिवीत व मालमत्तेचे रक्षण करणे.
- **प्रत्यक्ष कार्य:-** शासनाने ठरवून दिलेले कामकाज, कायदा व सुव्यवस्था राखणे, सुरळीत वाहतूक, गुन्हे प्रतिबंध, गुन्हे शोध, सामाजिक सुरक्षा इ.

कलम ४(१)ख (दोन)

अधिकारी आणि कर्मचारी यांचे अधिकार आणि कर्तव्ये

महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ मध्ये पोलीस दलाचे कार्य, कर्तव्य आणि जबाबदा-या याबाबत सविस्तर रित्या नमुद आहे. या कार्यालयातील पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड यांना मदत करण्याकरीता पुढील प्रमाणे पोलीस अधिकारी व कर्मचारी मंजूर झालेले आहेत.

पोलीस आयुक्तालयाच्या हददीनुसार पोलीस ठाणे व कार्यान्वीत शाखा

कार्यालय प्रमुखांचे नाव व पदनाम		
पोलीस आयुक्त		
पोलीस सह आयुक्त		
अप्पर पोलीस आयुक्त, गुन्हे		
अप्पर पोलीस आयुक्त, प्रादेशिक		
पोलीस उप - आयुक्त		
पोलीस ठाणे		
पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०१		
सहाय्यक पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग		पिंपरी पोलीस स्टेशन
		चिंचवड पोलीस स्टेशन
		निगडी पोलीस स्टेशन
सहाय्यक पोलीस आयुक्त, चिंचवड विभाग		दापोडी पोलीस स्टेशन
		संत तुकारामनगर पोलीस स्टेशन
		सांगवी पोलीस स्टेशन
पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०२		
सहाय्यक पोलीस आयुक्त, हिंजवडी विभाग		बावधन पोलीस स्टेशन
		हिंजवडी पोलीस स्टेशन
सहाय्यक पोलीस आयुक्त, वाकड विभाग		रावेत पोलीस स्टेशन
		वाकड पोलीस स्टेशन
		काळेवाडी पोलीस स्टेशन
पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०३		
सहाय्यक पोलीस आयुक्त, भोसरी एम.आय.डी.सी विभाग		दिघी पोलीस स्टेशन
		भोसरी पोलीस स्टेशन
		भोसरी एम.आय.डी.सी पोलीस स्टेशन
सहाय्यक पोलीस आयुक्त, चाकण विभाग		उत्तर चाकण पोलीस स्टेशन
		दक्षिण चाकण पोलीस स्टेशन
		आळंदी पोलीस स्टेशन
पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०४		
सहाय्यक पोलीस आयुक्त, देहुरोड विभाग		चिखली पोलीस स्टेशन
		देहुरोड पोलीस स्टेशन
		शिरगाव परंदवडी पोलीस स्टेशन
सहाय्यक पोलीस आयुक्त, म्हाळुंगे एम.आय.डी.सी. विभाग		तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन
		तळेगाव एम.आय.डी.सी पोलीस स्टेशन
		उत्तर म्हाळुंगे एम.आय.डी.सी पोलीस स्टेशन
		दक्षिण म्हाळुंगे एम.आय.डी.सी पोलीस स्टेशन

पोलीस उप-आयुक्त,गुन्हे		
सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे ०१		युनिट ०१
		युनिट ०२
		युनिट ०३
		युनिट ०४
		अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष
		गुंडा विरोधी पथक / शस्त्र विरोधी पथक
		मालमत्ता गुन्हे विरोधी पथक
		विशेष बाल पथक /महिला सहाय्यक कक्ष
		औद्योगीक तक्रारी निवारण पथक
सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे ०२		पी.सी.बी
		एम.ओ.बी
		अमंली पदार्थ विरोधी पथक
		खंडणी विरोधी पथक
		गुन्हे शाखा नियंत्रण पथक
		सी.सी.टी.एन.एस.
		जेष्ठ नागरिक कक्ष
		कम्युनिटी पोलीसिंग
सहाय्यक पोलीस आयुक्त सायबर व आर्थिक गुन्हे शाखा		सायबर पोलीस ठाणे
		आर्थिक गुन्हे शाखा
पोलीस उप-आयुक्त,विशेष शाखा		
सहाय्यक पोलीस आयुक्त विशेष शाखा		विशेष शाखा
		पासपोर्ट पडताळणी शाखा
		चारित्र्य पडताळणी शाखा
		परकीय नागरिक नोंदणी विभाग
पोलीस उप-आयुक्त,मुख्यालय		
सहाय्यक पोलीस आयुक्त प्रशासन		पोलीस मुख्यालय
		मोटार परिवहन विभाग
		पोलीस कल्याण शाखा
		मंत्रालयीन अधिकारी व कर्मचारी
		सेवा ॲप युनिट
		पोलीस नियंत्रण कक्ष
सहाय्यक पोलीस आयुक्त वायरलेस		वायरलेस विभाग
पोलीस उप-आयुक्त,वाहतुक शाखा		
सहाय्यक पोलीस आयुक्त वाहतुक विभाग १		भोसरी वाहतूक विभाग
		निगडी वाहतूक विभाग
		पिंपरी वाहतूक विभाग
		सांगवी वाहतूक विभाग
सहाय्यक पोलीस आयुक्त वाहतुक विभाग २		वाकड वाहतूक विभाग
		हिंजवडी वाहतूक विभाग
		बावधन वाहतूक विभाग
		देहुरोड वाहतूक विभाग
		तळेगाव दाभाडे वाहतूक विभाग
सहाय्यक पोलीस आयुक्त वाहतुक विभाग ३		चिखली वाहतूक विभाग
		दिघी-आळंदी वाहतूक विभाग
		महाळुंगे वाहतूक विभाग
		चाकण वाहतूक विभाग
सहाय्यक पोलीस आयुक्त सायबर सेल व आर्थिक गुन्हे शाखा		१. सायबर पोलीस ठाणे सायबर सेल २. आर्थिक गुन्हे शाखा ३. TAW

उपरोक्त कार्यालय/शाखा/पोलीस स्टेशन /यांची खालील प्रमाणे वर्गवारी केलेली आहे.

पोलीस आयुक्त
पोलीस सह आयुक्त
अप्पर पोलीस आयुक्त,गुन्हे
अप्पर पोलीस आयुक्त, प्रादेशिक

⇩

⇩

⇩

पोलीस उप-आयुक्त परिमंडळ ०१		पोलीस उप-आयुक्त परिमंडळ ०२		पोलीस उप-आयुक्त परिमंडळ ०३		पोलीस उप-आयुक्त परिमंडळ ०४	
सहा.पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग	सहा.पोलीस आयुक्त, सांगवी विभाग	सहा.पोलीस आयुक्त, हिंजवडी विभाग	सहा.पोलीस आयुक्त,वाकड विभाग	सहा.पोलीस आयुक्त, चाकण विभाग	सहा.पोलीस आयुक्त, भोसरी एम.आय.डी.सी. विभाग	सहा.पोलीस आयुक्त, देहुरोड विभाग	सहा.पोलीस आयुक्त, म्हाळुंगे एम.आय.डी.सी. विभाग
पिंपरी पोलीस स्टेशन	दापोडी पोलीस स्टेशन	बावधन पोलीस स्टेशन	रावेत पोलीस स्टेशन	दिघी पोलीस स्टेशन	उत्तर चाकण पोलीस स्टेशन	चिखली पोलीस स्टेशन	तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन
चिंचवड पोलीस स्टेशन	संत तुकारामनगर पोलीस स्टेशन	हिंजवडी पोलीस स्टेशन	वाकड पोलीस स्टेशन	भोसरी पोलीस स्टेशन	दक्षिण चाकण पोलीस स्टेशन	देहुरोड पोलीस स्टेशन	तळेगाव एम.आय.डी.सी पोलीस स्टेशन
निगडी पोलीस स्टेशन	सांगवी पोलीस स्टेशन		काळेवाडी पोलीस स्टेशन	भोसरी एम.आय.डी.सी पोलीस स्टेशन	आळंदी पोलीस स्टेशन	शिरगाव परंदवडी पोलीस स्टेशन	उत्तर म्हाळुंगे एम.आय.डी.सी पोलीस स्टेशन दक्षिण म्हाळुंगे एम.आय.डी .सी पोलीस स्टेशन

पोलीस उप-आयुक्त, गुन्हे			पोलीस उप-आयुक्त, विशेष शाखा
सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे ०१	सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे ०२	सहा.पोलीस आयुक्त, सायबर व आगुशा	सहा.पोलीस आयुक्त, विशेष शाखा
१)युनिट ०१ २) युनिट ०२ ३) युनिट ०३ ४) युनिट ०४ ५) अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष ६) गुंडा विरोधी पथक/शस्त्र विरोधी पथक ७)मालमत्ता गुन्हे विरोधी पथक ८) विशेष बाल पथक/महिला सहाय्यक कक्ष ९) औद्योगीक तक्रारी निवारण पथक	१) पी.सी.बी २) एम.ओ.बी ३) अमंली पदार्थ विरोधी पथक ४) खंडणी विरोधी पथक ५) गुन्हे शाखा नियंत्रण पथक ६).संगणक शाखा ७) जेष्ठ नागरिक कक्ष ८) कम्युनिटी पोलीसिंग	१) सायबर पोलीस ठाणे सायबर सेल २) आर्थिक गुन्हे शाखा ३) [illegible]	१.विशेष शाखा २.पासपोर्ट पडताळणी ३.चारित्र्य पडताळणीशाखा ४.परकीय नागरीक नोदणी विभाग

पोलीस उप-आयुक्त मुख्यालय			पोलीस उप-आयुक्तवाहतुक विभाग		
सहा.पोलीस आयुक्त प्रशासन	सहा.पोलीस आयुक्त अभियान	सहा.पोलीस आयुक्त वायरलेस	सहाय्यक पोलीस आयुक्त वाहतुक विभाग १	सहाय्यक पोलीस आयुक्त वाहतुक विभाग २	सहाय्यक पोलीस आयुक्त वाहतुक विभाग ३
पोलीस मुख्यालय	अर्ज शाखा	पोलीस दळण वळण व माहिती	भोसरी वाहतूक	वाकड वाहतूक	चिखली वाहतूक
मोटार परिवहन विभाग			निगडी वाहतूक	हिंजवडी वाहतूक	महाळुंगे वाहतूक
मंत्रालयीन अधिकारी व कर्मचारी			पिंपरी वाहतूक	बावधन वाहतूक	चाकण वाहतूक
कल्याण शाखा			सांगवी वाहतूक	देहुरोड वाहतूक	दिघी-आळंदी वाहतूक
सेवा ॲप युनिट				तळेगाव दाभाडे वाहतूक	
पोलीस नियंत्रण कक्ष					

पोलीस अधिकारी व अमंलदार यांचे अधिकार आणि कर्तव्ये

अ.क्र	पद	संख्या	कार्य/ कर्तव्य
१	पोलीस आयुक्त	०१	पोलीस आयुक्त हे कार्यालय प्रमूख आहेत. आयुक्तालयातील पोलीस बलाचे निर्देशन आणि देखरेख यासाठी पोलीस आयुक्त जबाबदार असतात. सर्व मोठया समस्यांबाबत विषेशतः अंमलदार वर्ग यांचे प्रशिक्षण व साधन सामग्री पुरवठा आणि भांडार वस्तू, बलाच्या निर्वाह खर्चासाठी आवश्यक असलेली आर्थिक तरतुद, वेगवेगळ्या श्रेणीतील अधिका-यांचे अधिकार व कर्तव्य यांच्याशी संबंधीत सर्वसाधारण धोरणांच्या समस्यांबाबत निर्णय घेणे. कायदा व सुव्यवस्था राखण्याची आणि गुन्हा प्रतिबंधक व अन्वेषण या संबंधी कार्यक्षमतेच्या गरजेनुसार तपासणी करून संपर्क साधणे ही पोलीस आयुक्त यांची सर्वसाधारण कर्तव्ये असतात. त्यांचे अधिपत्याखाली वर्ग १,२,३ चे पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी तसेच कार्यालयीन कर्मचारी कार्यरत असतात.
२	सह.पोलीस आयुक्त	०१	पोलीस सह आयुक्त हे पोलीस आयुक्तांना सहाय्यक अधिकारी म्हणून निर्माण केलेले पद आहे. पोलीस सह आयुक्त हे त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शाखा व कार्यालयातील अधिकारी/अंमलदार यांना योग्य ते मार्गदर्शन करतात.
३	अप्पर पोलीस आयुक्त	०१	अप्पर पोलीस आयुक्त, गुन्हे हे पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शाखा व कार्यालयातील अधिकारी/अंमलदार यांना वेळोवेळी योग्य ते मार्गदर्शन करत असतात, प्रशासकिय कामकाज पाहतात.
४	पोलीस उप-आयुक्त परिमंडळ ०१, ०२ व ०३	०६	पोलीस उप आयुक्त (परिमंडळ१,२ आणि ३) यांचे नियंत्रणाखाली पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्यांअतर्गत कायदा आणि सुव्यवस्था, गुन्हेगारीस प्रतिबंध /अन्वेषण करण्याचे काम पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी योग्य व कार्यक्षम रितीने करित असल्याची खातरजमा करणे, अधिकारी / अंमलदार वर्गास शिस्त लागू करण्यासाठी तसेच त्यांची गा-हाणी मिटवण्यासाठी पोलीस ठाण्यास अनपेक्षित भेटी देवुन अधिकारी / कर्मचारी दक्ष आहेत किंवा नाही हे पाहणे, आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्यांची वार्षिक तपासणी घेणे, मासिक भेटी देणे, वार्षीक तपासणी दरम्यान कर्मचा-यांचे सेवा अभिलेख पडताळणी करुन शेरे नोंदविणे, परिमंडळातील गुन्ह्याचा आढावा घेवुन गंभीर गुन्हयाच्या घटनास्थळी परिस्थितीनुसार भेटी देणे. हे पोलीस उप आयुक्त परिमंडळ यांचे कर्तव्य आहे. सदर कामी त्यांच्या अधिपत्त्याखालील सहा. पोलीस आयुक्तांना आवश्यक असेल तेव्हा मार्गदर्शन व सुचनाही ते देवु शकतात. हद्दीतील ध्वनिक्षेपणासाठी परवानगी देणे इ. कामे ते पाहतात.
५	.पोलीस उप -आयुक्त गुन्हे शाखा	०१	१० वर्षावरील पोलीस कर्मचारी यांचे वार्षिक शेरे, पोलीस अधिकारी व मंत्रालयीन कर्मचारी यांचे गोपनिय अहवाल लिहिणे, क्राईम युनिट यांना भेटी देणे, महत्वाच्या गुन्हयांमध्ये मार्गदर्शनपर सुचना देणे, प्रशासकीय कामकाज पाहणे.
	पोलीस उप- आयुक्त विशेष शाखा	०१	पोलीस उप आयुक्त विशेष शाखा यांचे नियंत्रणाखाली राजकीय, शासकीय, निमशासकीय व सर्व पक्षांच्या हालचालीची माहीती संकलीत करुन घेणे. विविध बंदोबस्त योजना कार्यान्वीत करणे. पारपत्र शाखा, विदेशी नागरीक शाखेचे कामकाजावर नियंत्रण ठेवणे. १०वर्षावरील पोलीस कर्मचारी यांचे वार्षिक शेरे लिहीणे.
६	पोलीस उप -आयुक्त वाहतुक शाखा	०१	शहरातील वाहतूक ही तीन विभागात विभागलेली असून त्या विभागात ०१ पोलीस उपआयुक्त व एक सहा. पोलीस आयुक्तांच्या देखरेखी खाली वाहतुक कार्यान्वीत आहे. पोलीस निरीक्षक, पोलीस उप-निरीक्षक, आणि पोलीस कर्मचारी वर्ग यांचे मदतीने शहरातील सर्व वाहतूक मार्गावर नियंत्रण ठेवणे. वाहतूक मार्गावरील बंदोबस्ताचे आयोजन व नियंत्रण तसेच सर्व वाहतूक समस्या सोडविणे वाहतूकीचे नियमानुसार नियमांचा भंग करणा-यावर मोटार वाहन कायदयाप्रमाणे केसेस करून दंड वसूल करणे. १० वर्षावरील पोलीस कर्मचारी यांचे वार्षिक शेरे, पोलीस अधिकारी व मंत्रालयीन कर्मचारी यांचे गोपनिय अहवाल लिहिणे.

७	पोलीस उप-आयुक्त मुख्यालय	०१	पोलीस उप आयुक्त मुख्यालय यांचे नियंत्रणाखाली पोलीस कार्यालयातील प्रशासनीक शाखा, मोटार परिवहन विभाग, बिनतारी संदेश विभाग आणि पोलीस मुख्यालय हे विभाग येतात. सहा. पोलीस आयुक्त प्रशासन, सहा. पोलीस आयुक्त, नियंत्रण कक्ष आणि सहा. पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश विभाग हे त्याना सदर शाखांचे कामकाज पाहण्यासाठी सहाय्यक अधिकारी म्हणून काम पाहतात. त्यांच्या नियंत्रणाखालील विभागांवर सर्व साधारण देखरेख ठेवण्यास ते जबाबदार असतात. १० वर्षावरील पोलीस अंमलदार यांचे वार्षिक शेरे लिहीणे. मुख्य पोलीस कार्यालयाच्या नियंत्रणाचे अधिन राहून करमणूक, मनोरंजन, खाद्यगृहे, सार्वजनिक ठिकाणी ध्वनिक्षेपकांचा वापर इत्यादीच्या सबंधातील रितसर परवाने देण्याचे काम पाहतात. पोलीस मुख्यालय येथील देखरेखी कामी राखीव पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी कार्यरत असून पोलीस मुख्यालयातील कार्यकारी दलावर त्यांचे नियंत्रण असते. या व्यतिरिक्त कार्यालयातील प्रशासनीक शाखा, अस्थापना शाखा, पत्र व्यवहार शाखा, लेखा शाखा, वाचक शाखा, इत्यादीचे कामकाज त्यांचे नियंत्रणा खाली चालते. आस्थापना शाखेमध्ये पोलीस अधिकारी /कर्मचारी/वर्ग -३, लिपीक संवर्ग/वर्ग-४ कर्मचारी यांची आस्थापना त्यांचे वेतन व भत्ते, रजा आदेश निर्गमीत करणे, प्रशिक्षण, पोलीस भरती प्रक्रीया, शिक्षा, बक्षीसे, सेवानिवृत्ती, वेतन वाढ, सेवा जेष्ठता, पदोन्नती, सेवाजेष्ठता सूची तयार करणे, विभागीय चौकशीचे कामकाज इत्यादी कामे आहेत.
८	सहा.पोलीस आयुक्त	१२	सहायक पोलीस आयुक्त हे माहीती अधिकार- अपिलीय अधिकारी असतात. पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांचे कामकाजावर नियंत्रण ठेवणे व गुन्हे प्रतिबंध करणे. विषेश कार्यकारी अधिकारी या पदाचा कार्यभार यांच्याकडे असुन प्रतिबंधक कार्यवाही खालील दाखल होणा-या गुन्हयांचे कामकाज व त्या व्यतिरिक्त त्यांचे नियंत्रणाखाली असलेल्या पोलीस ठाण्यांच्या सर्व कामकाजावर नियंत्रण ठेवणे. १० वर्षाचे आतील पोलीस कर्मचारी यांचे वार्षिक शेरे लिहीणे, पोलीस अधिकारी यांचे गोपनिय अहवाल लिहीणे. प्रशासकिय कामकाज पाहणे, पोलीस स्टेशन भेट, दोषारोपपत्राची पडताळणी करणे, पोलीस स्टेशन येथे दाखल होणा-या गुन्हयाच्या तपासकामी मार्गदर्शन करणे. ॲट्रॉसिटी ॲक्ट प्रमाणे दाखल गुन्हयांचा तपास करणे. पोलीस स्टेशन वार्षिक निरिक्षण घेणे, तडीपार प्रकरणांबाबत चौकशी करणे, तडीपार प्रकरणाचे अहवाल पाठविणे, वरिष्ठांकडुन प्राप्त होणा-या अर्जाची चौकशी करणे.
९	पोलीस निरीक्षक /प्रभारी अधिकारी	६८	पोलीस निरीक्षक/प्रभारी अधिकारी त्यांच्या क्षेत्रातील गुन्हयांचा प्रतिबंध आणि तपास तसेच त्यांच्या वरिष्ठांचे आदेश अंमलात आणणे, त्यांच्या हाताखालील कर्मचा-यांमध्ये योग्य प्रकारे शिस्त राखली जात आहे, हे पाहण्यासाठी पोलीस निरीक्षक हे जबाबदार असतात. त्यांनी त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या कामांची सांगोपांग माहिती करून घ्यावी व त्यांच्या हाताखालील सर्व पोलीस अमंलदार कर्तव्यावर हजर असून, कर्तव्यदक्ष आहेत हे पहावे. सार्वजनिक शांततेस बाधक ठरणारा कोणताही गुन्हा किंवा प्रसंग घडण्याची शक्यता पोलीस निरीक्षक/प्रभारी अधिकारी यांना माहित होईल तेव्हा त्या शक्यतेची माहिती त्यांना जी खबरदारीची उपाययोजना करणे उचित वाटेल त्या उपाययोजनेसह त्यांच्या सर्व वरिष्ठ अधिका-यांना कळवतील. आवश्यकतेनुसार ते शेजारच्या पोलीस ठाण्याच्या पोलीस प्राधिका-याबरोबर थेट पत्रव्यवहार करतील आणि प्रभारातून निसटून जाणा-या अथवा निसटुन जावुन त्यांच्या प्रभारात येणा-या अपराध्यांना पकडण्यासाठी त्या प्राधिका-याबरोबर एक विचाराने कार्यवाही करतील आणि सर्वसाधारणपणे गुन्हयांना प्रतिबंध करण्यासाठी किंवा त्यांचा तपास लावण्यासाठी उपाय योजतील. पोलीस निरीक्षक एखाद्या विशिष्ठ प्रकरणाचा तपास व्यक्तीशः स्वतः हाती घेतील तेव्हा फौजदार हे त्यांच्या आदेशानुसार कार्य करतील. परंतु इतर बाबतीत ते निरीक्षकांचे सर्वसाधारण निर्देशन व सल्ला यांना अधिन राहुन स्वतंत्रपणे कार्य करतील. तथापि यामुळे ते त्यांच्या वर नमुद जबाबदा-यांमधुन मुक्त होणार नाही आणि दंडाधिका-यांकडुन आदेश मिळाल्याखेरीज पोलीसांना कार्यवाही करणे शक्य होणार नाही. अशी प्रकरणे नसतील तर आदेशांसाठी न थांबता ते त्या सर्व प्रकरणामधील त्यांचे कार्य ताबडतोब सुरू करतील. २. पोलीस आयुक्त/ पोलीस सह आयुक्त/पोलीस उप आयुक्त/सहा.पोलीस आयुक्त निर्देष देतील अशा रितीने पोलीस निरीक्षक/प्रभारी अधिकारी त्यांच्या प्रभागातील पोलीसांची ठराविक काळाने तपासणी करतील. बलातील व्यक्तींनी केलेला कोणताही निष्काळजीपणा, गैरवर्तणूक किंवा आदेशाची अवज्ञा, रजेशिवाय अनुपस्थिती किंवा त्यांना झालेला अपघात यांचे वृत्त पोलीस आयुक्त/ पोलीस सह आयुक्त/पोलीस उप आयुक्त/सहा.पोलीस आयुक्त यांना कळवतील आणि एकंदरीत त्यांच्या स्वतःच्या पोलीस ठाण्यामधील सुव्यवस्था रक्षणाच्या व्यवस्थेच्या क्षमतेशी संबंधीत सर्व बाबींची माहिती वरिष्ठांना सतत पुरवतील. त्यांच्या ठाण्याच्या हद्दीबाहेरून येणा-या गुन्हेगारांच्या लोंढयांमुळे किंवा इतर पोलीस ठाण्याकडून सहकार्य न मिळाल्यामुळे पोलीस निरीक्षक/प्रभारी अधिकारी यांना काही अडचणी आल्यास त्या अडचणी कळविण्यास ते मोकळे आहेत. ३. पोलीस निरीक्षक/प्रभारी अधिकारी यांनी त्यांच्या प्रभारातील चौक्यांची महिन्यातून निदान एकदा तपासणी करावी व अशा वेळी चौक्यांमधील त्यांच्या शिपायांना त्यांच्या कर्तव्याबद्दल सूचना दयाव्यात. ४. त्यांनी त्यांच्या पोलीस ठाण्याच्या कक्षेतील विभांगाना/गावांना भेट देऊन पोलीस भेट, नोंद पुस्तके आणि हजेरीपट तपासावे व नियम ७६ मध्ये अंतर्भुत असलेल्या तरतुदी दृष्टीसमोर ठेवुन गावातील गुन्ह्यांसंबंधीच्या नोंदवह्या अदययावत करुन घ्याव्यात. त्यांच्या प्रभारात पडणा-या चालु घडामोडींची माहिती मिळविण्यासाठी प्रत्येक संधी त्यांनी साधावी आणि त्यांच्या

			सभोवतालच्या लोकांची विषेशतः गुंड व संशयीत व्यक्तींची खरीखुरी माहिती त्यांना असावी. त्यांच्या हाताखालील व्यक्ती बारीक सारीक माहिती मिळविण्यासाठी एकही संधी दवडणार नाहीत. हे पोलीस निरीक्षक/प्रभारी अधिका-यांनी पहावे.
१०	राखीव पोलीस निरीक्षक	०१	पोलीस उपनिरीक्षक कंपनी ऑर्डरली, भांडारपाल ,बँड मेजर, पोलीस रोखपाल , लायसन्स, अर्जंट शस्त्र व दारूगोळा इन्चार्ज, कवायत निर्देशक व इतर सहाय्यक पोलीस कर्मचारी यांच्या मदतीने पोलीस मुख्यालयातील कामकाज पाहणे तसेच पोलीस नियमावली १९९९ चे भाग ०२ व ०३ प्रमाणे फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ प्रमाणे मुंबई पोलीस कायदा १९५१ प्रमाणे कार्य व कर्तव्य करतील.
११	सहा.पोलीस निरीक्षक	८८	जिल्ह्यात असलेल्या पोलीस ठाण्यामध्ये दाखल होणारे विविध गुन्ह्यांचा तपास पोलीस ठाण्याप्रमाणे किंवा वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे उपलब्ध अधिकारी व कर्मचारी यांच्या मदतीने पुर्ण करणे. हद्दीतील धार्मिक कार्यक्रम उत्सव बंदोबस्त शांततेत पार पाडणे. तसेच पोलीस नियमांमध्ये १९९९ चे भाग ०२ व ०३ प्रमाणे फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ प्रमाणे मुंबई पोलीस कायदा १९५१ प्रमाणे कार्य व कर्तव्य आहेत.
१२	पोलीस उप-निरीक्षक	२१९	जिल्ह्यात असलेल्या पोलीस ठाण्यामध्ये दाखल होणारे विविध गुन्ह्यांचा तपास पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी किंवा वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे उपलब्ध अधिकारी व कर्मचारी यांच्या मदतीने पूर्ण करणे. त्याचप्रमाणे ज्या प्रकरणांमध्ये दंडाधिका-याकडुन आदेश मिळाल्याखेरीज पोलिसांना कार्यवाही करणे शक्य होणार नाही. असे प्रकरण नसतील तर आदेशासाठी न थांबता ते त्या सर्व प्रकरणांमधील त्यांचे कार्य ताबडतोब सुरू करतील. ज्यावेळी पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी किंवा वरिष्ठ निर्देश देतील त्या-त्यावेळी तपासणी करतील व अशावेळी चौक्यांमधील त्यांच्या शिपायांना त्यांच्या कर्तव्याबद्दल सूचना देतील त्यांच्या हाता खालील पोलिसांनी कर्तव्यात केलेल्या चुका त्यांच्या निर्देशनास आणुन देतील. हद्दीतील धार्मिक कार्यक्रम उत्सव बंदोबस्त पोलीस ठाणे अधिकारी किंवा वरिष्ठांच्या आदेशानुसार शांततेत पार पाडणे तसेच पोलीस नियमावली १९९९ चे भाग ०२ व ०३ प्रमाणे फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ प्रमाणे मुंबई पोलीस कायदा १९५१ प्रमाणे कार्य व कर्तव्य आहेत.
१३	सहा.पोलीस उपनिरीक्षक	४२३	सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक हे त्यांचे वरिष्ठ म्हणून नेमलेल्या अधिक-यांच्या आदेशाच्या अधीन असतात हवालदारांना नेमुन दिलेल्या विभागातील मर्यादेमध्ये त्यांना दुय्यम असणारे सर्व पोलिसांकडुन आदेश पालन करून घेण्यात हे हक्कदार असतात. त्यांचे विभागात घडणारे सर्व गुन्हे किंवा घटना घडणार असल्यास त्या संबंधीची संभाव्य माहिती वरिष्ठांना कळविणे गरजेचे असते. विभागातील काही क्षेत्राचा गस्त प्रकार हवालदाराकडे असेल त्यावेळी त्या सर्व बाबींमध्ये ग्रामस्थांच्या एकविचाराने कृती करतील शहरातील पोलीस कार्यरत असणारे अधिकारी यांना त्यांचे गुन्हे तपास कामकाजात मदत करणे हद्दीतील धार्मिक कार्यक्रम उत्सव, बंदोबस्त शांततेत पार पाडणे तसेच वरिष्ठांनी दिलेल्या आदेश सुचनांची तातडीने अंमलबजावणी करणे तसेच पोलीस नियमावली १९९९ चे भाग ०२ व ०३ प्रमाणे फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ प्रमाणे मुंबई पोलीस कायदा १९५१ प्रमाणे कार्य व कर्तव्य आहेत.
१४	पोलीस हवालदार	१११९	अ) हवालदार हे त्यांचे वरिष्ठ म्हणून नेमलेल्या फौजदारांच्या आणि पोलीस बलातील वरिष्ठ अधिका-यांच्या आदेशाच्या अधिन असतात. हवालदारांना नेमून देण्यात येईल त्या प्रभाराच्या मर्यादांमध्ये त्यांना दुय्यम असणा-या सर्व पोलीसांकडून आज्ञा पालन करुन घेण्यास ते हक्कदार असतात. ब) हवालदारांनी त्यांच्या प्रभारात घडणारे सर्व गुन्हे आणि दखलपात्र अपराध घडणार असल्यासंबंधीची कोणतीही संभवनीयता त्यांच्या फौजदारांना कळविणे आवश्यक असते. परंतु अपराध्यांना शोधून त्यांना पकडण्यासाठी आवश्यक ती चौकशी सुरु करण्यासाठी त्यांना आदेष मिळविण्यासाठी त्यांनी थांबून राहता कामा नये. क) गुन्ह्यास प्रतिबंध करताना व सुव्यवस्था राखताना हवालदार, त्यांचे वरिष्ठ आधिकारी त्यांना देतील अशा आदेशाचे पालन करतील. ड)अचानक किंवा संशयास्पद रितीने झाालेल्या मृत्युच्या बाबतीत हवालदार, किंवा हवालदार हजर नसेल तर शिपाई त्याला फौजदारकडून किंवा अन्य वरिष्ठ अधिका-याकडून आदेश मिळे पर्यंत प्रेत जाळण्यास, पुरवण्यास किंवा (पाराशांच्या प्रथेप्रमाणे) टाकून देण्यास प्रतिबंध करतील. इ) गावातील विशिष्ट नाक्यांच्या किंवा गस्त क्षेत्रांचा प्रभार हवालदारांकडे असेल त्यावेळी ते पोलीस व्यवस्था विषयक सर्व बाबींमध्ये ग्राम पोलीस प्रमुखांबरोबर एक विचाराने कृती करतील. फ) हाताखालील पोलीसांनी देखील कर्तव्यात केलेल्या हयगयीची आणि कोणत्याही आदेशाची अवज्ञा केल्याची किंवा त्यांच्या इतर गैरवर्तनाची सर्व प्रकरणी वरिश्ठ अधिका-यांच्या तात्काळ निदर्शनास आणुन देण्यास हवालदारांना जबाबदार मानण्यात येईल. ग) हवालदार हे फौजदारांचे सहाय्यक असतात आणि त्यांनी फौजदारांना शिपायांची कवायत घेण्याच्या, शिकवण्याच्या कामात व नाक्यावर वारंवार गस्त घालण्याच्या कामात सहाय्य करावे. शिपायांची केलेली कोणतीही हयगय ताबडतोब पोलीस निरीक्षकांना कळविण्यात यावी. तसेच त्यांच्या प्रशंसनीय कृतीही वरिष्ठांच्या निदर्षनास आणुन द्याव्यात.
१५	पोलीस शिपाई	२८३१	१) गुन्ह्यास प्रतिबंध व त्याचा तपास करणे, कायदा आणि सुव्यवस्था राखणे, फौजदार प्रक्रिया संहितेनुसार दंडाधिका-यांचे वॉरंट्स आवश्यक असल्यास त्या बाबतीत वॉरंटवर अपराध्यांना पकडणे, त्यांच्या ताब्यात देण्यात येतील असे कैदी, निधी किंवा खाजगी व सरकारी मालमत्ता यांच्या सोबत संरक्षण म्हणून जाणे व त्यावर पहारा करणे आणि मुंबई

			पोलीस अधिनियम १९५१ च्या नियम २२ अन्वये पोलीस अधिका-यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार हवालदार आणि वरिष्ठ अधिकारी आदेश देतील अशी पोलीस व्यवस्थेविशयक कामे शिपाई पार पाडतील. २) ज्या गुन्हयासाठी पोलीस वॉरंटवाचून अटक करू शकतात, असा कोणताही गुन्हा घडल्यावर शिपायाने आदेशाची वाट न पाहता सहका-यांच्या माहितीसाठी ताबडतोब आणि व्यवहार्य असेल तेथे लेखी अहवाल दयावा. ३) आग लागल्याच्या किंवा इतर कोणत्याही संकटाच्या प्रसंगी सहाय्य करणे व जनतेच्या सुरक्षिततेसाठी आवाक्यात असेल ती प्रत्येक खबरदारी घ्यावी. हे देखील शिपायांचे कर्तव्य असेल. ४) नित्याचे गस्तीचे कर्तव्य शिपाई पार पाडणार नाही. गावामध्ये फेरफटका मारून काही माहिती मिळते काय हे पाहण्यासाठी शिपायांचा उपयोग करावयाचा नसतो.गस्तवाल्याच्या क्षेत्रात येणा-या कोणत्याही कर्तव्यासाठी शिपायाचा वापर करावयाचा असेल, तेव्हा त्याला नेमक्या सुचना देण्यात आल्या पाहिजे.
१६	पोलीस निरीक्षक परिवहन शाखा	०१	१.मोटार परिवहन अधिकारी हे त्यांची जेथे नियुक्ती आहे तेथील विभागाचे थेट प्रभारी अधिकारी राहतील २.ते प्रशासकीय बाबतीत पोलीस आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली असतील आणि तांत्रिक बाबततीत पोलीस उप महानिरीक्षक,मोटार परिवहन विभाग, पुणे यांच्या नियंत्रणाखाली असतील. ३.त्यांच्या प्रभारातील सर्व वाहनांच्या अधुन मधून पुर्ण तपासणी करीता आणि शक्यतोवर नेहमीच वाहने सुस्थितीत ठेवण्यास जबाबदार असतील. ४.त्यांच्या प्रभारामधील खालील सर्व शाखांवर ते नियंत्रण ठेवून देखरेख करतील. अ) वाहन दुरूस्ती आणि परिक्षण, ब) भांडाराचा व्यवहार ;पेट्रोल, ऑईल आणि वंगण व सुटे भाग इत्यादी. क) मोटार परिवहनचे विविध अभिलेख ठेवणे., ड) प्रषासकिय अभिलेख ठेवणे. ५.त्यांच्या प्रभारातील मोटार परिवहन विभागाची तपासणी वरिष्ठांनी करण्यासाठी जरूर ती व्यवस्था ते करतील आणि सर्व भांडार, खतावणी ;लेजरद्ध आणि इतर मोटार परिवहन अभिलेख अद्ययावत ठेवतील, तसेच जरूर ती कारवाई करतील, सुचना आणि तपासणी टिपणीची पुर्तता करतील. ६.त्यांच्या कनिष्ठ कर्मचा-यांना योग्य प्रकारे कर्तव्य वाटप केले जाते. याबाबत ते खात्री करतील आणि त्यांची कार्यक्षमता व शिस्त राखतील. ७.अनियमितता, बेशिस्त वाहनांचा गैरवापर अपघात इ. बाबतची प्रकरणे ते न चुकता आपल्या वरिष्ठ अधिकारी यांच्या निदर्षनास आणुन देतील तसेच शासकीय वाहने लिलाव करणे पोलीस निरिक्षक, मोटार परिवहन विभाग यांच्या अधिपत्याखाली खालील कर्मचारी काम करतात. १. मोटार परिवहन पर्यवेक्षक २. पोलीस हवालदार चालक यांत्रिकी ;मेकॅनिकद्ध
१७	लेखा शाखा	०१	लेखा शाखेमध्ये वर्ग- १ ते ४ अधिकारी/कर्मचारी वर्गाचे वेतन व इतर भत्ते/ आकस्मीक खर्चाची देयके तयार करणे, रकमांचे वाटप करणे, पोलीस आयुक्तालया साठी विविध प्रकारची अनुदाने शासनाकडे वार्षिक अंदाजपत्रके पाठवून मंजुर करून घेणे इ. कामकाज चालते.
१८	पत्रव्यवहार शाखा		पत्रव्यवहार शाखेत अधिकारी आस्थापना, लिपीक वर्ग/वर्ग ४ आस्थापना या व्यतिरिक्त प्रबंधक शाखेत आवक जावक, बारनिशी, टपाल निर्गती स्टेशनरी तसेच कार्यालयीन कामकाजासाठी विविध साहित्याची खरेदी करणे इ. कामे येतात. इमारत शाखेत कार्यालयीन/पोलीस ठाणेकडील इमारती यांचे देखभाल, दुरूस्ती, भुखंड आरक्षण तसेच प्राप्त होणा-या अनुदानानुसार शासकीय इमारतींचे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधकाम पुर्ण करून घेणे इत्यादी कामे येतात. त्याचप्रमाणे पोलीस अधिकारी/कर्मचारी वर्गास निवासस्थाने वाटप,विद्युत देयके, पाणीपटट्री टेलीफोन, आरोपी आहार भत्ता, घरपटट्री देयके मंजुर करणे, पोलीस अधिकारी/कर्मचा-यांची वैद्यकिय परिपुर्ती देयके मंजुर करणे, दुरध्वनी देयके मंजुर करणे इत्यादी कामे स्वतंत्र कक्षामार्फत करण्यात येतात.
१९	आस्थापना शाखा		अधिकारी /अंमलदार यांचे आस्थापनाविषयची कामकाज पदोन्नती,बदली,वेतनवाढ ,वेतन निश्चिती इत्यादी कामे
२०	अर्जचौकशी शाखा		अर्जशाखेकडे विविध पोलीस ठाणे/शाखांतर्गत प्राप्त झालेले स्थानिक तक्रार अर्ज/शासनाकडे/उपमुख्य मंत्रालयाकडील/ मुख्य मंत्रालयाकडील/पोलीस महासंचालक यांचेकडील तक्रार अर्ज अखत्यारीनुसार संबंधीत पोलीस ठाणे/शाखेस चौकशी कामी पाठविणे आणि उचीत कार्यवाही अंती अहवाल सादर करणे.जिल्हा/विभागीय लोकशाही दिनातील प्राप्त अर्जावर तसेच जिल्हा/विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समीतीतील अर्जावर अहवाल सादर करणे ही कामे येतात. या व्यतिरिक्त माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त अर्जावर मुदतीत कार्यवाही करुन अर्जदारास मुदतीत तपशील उपलब्ध करुन देणे ही कामे अर्ज चौकशी शाखे मार्फत करण्यात येतात.
२१	परवाना शाखा		परवाना शाखेकडे शस्त्र परवाना, सिनेमा परवाना नुतनीकरण, व्हिडीओ सिनेमा नुतनीकरण, स्फोटक परवाने शोभेची दारु), रॉकेल परवाने, खाजगी सुरक्षा एजन्सी परवाने, सायबर कॅफे

			जागेचा अहवाल, एफएल-३, सिएल-२, पेट्रोलियम, गॅस ना-हरकत प्रमाणपत्र, मंजूरी तसेच करमणूकीचे कार्यक्रमांना मंजूरी देणे व परवान्याचे नुतनीकरण करण्याचे काम आहे.
२२	पोलीस कल्याण विभाग		पोलीस कल्याण शाखेकडे पोलीस कल्याण निधीमधून पोलीस अधिकारी/कर्मचा-यांना विविध अनुदान वाटप, महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेचे कामकाज व तत्संबंधी कामे करण्यात येतात. त्याचप्रमाणे पोलीस कल्याण निधी वृध्दीगत करण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करुन निधी जमा करण्यात येतो. विविध कार्यक्रमासाठी पुरविणे, त्यांचेसाठी लागणारे साहित्य खरेदी करणे, क्रीडा साहित्य खरेदी करणे इत्यादी कामे करण्यात येतात.
२३	प्रशासकीय अधिकारी	०१	कार्यालयातील सर्व लिपिक वर्गीय कर्मचा-यांकडून त्यांना नेमून दिलेल्या प्रशासकीय कामकाजावर पर्यवेक्षण नियंत्रण देऊन त्यांच्याकडील कामकाज मुदतीत पूर्ण करून घेण्या साठी वेळोवेळी त्यांना सूचना आदेश मार्गदर्शन करणे, वरिष्ठांना दिलेल्या आदेशाची तात्काळ पूर्तता करून घेणे, दरमहा लागणारी माहिती लिहित मुद्देत वरिष्ठ कार्यालय सादर करण्याची कार्यवाही करणे कार्यालयीन कामकाज सुरळीत चालू राहील याची दक्षता ठेवणे
२४	प्रमुख लिपीक	०६	जिल्ह्यात होणारे पोलीस भरती पोलीस अधिकारी कर्मचा-यांच्या बदल्या, पदोन्नत्या, वार्षिक शीट रीमार्कस, आस्थापना, पत्रव्यवहार, लेखा शाखा, या सर्व शाखेतील सर्व लिपिकांच्या कामात देखील करणे हाताखालील लिपिकाकडून नियमित वेतन वाढ, वेतन निश्चिती, हस्त नोंदवही अद्यावत ठेवणे सेवा जेष्ठता यादी सुप्रसिद्ध करणे, पोलीस ठाणे शाखा यांच्याकडून विवरण पत्रके मागून मंजूर हजर रिक्त संख्याबळाच्या सेवा पटातील वेतन वाढ बक्षिसे शिक्षा सर्व प्रकारच्या रजांचा अभिलेख ओळखपत्र अज्ञांकित कक्ष पोलीस कर्मचा-यांचे प्रशिक्षण या स्वरूपाची करून घेणे,सेवापटामध्ये सर्व प्रकारचे नोंदी घेणे.
२५	वरिष्ठ लिपीक	१७	नेमून दिलेल्या कामकाजावर नियमाप्रमाणे टिपणी तयार करून ते मुदती पूर्ण, करणे वरिष्ठांच्या तसेच प्रशासकीय अधिकारी प्रमुख लिपिक यांच्या आदेशाच्या अधीन राहून आस्थापना पत्रव्यवहार लेखाशाखेतील कामकाज पाहणे.
२६	कनिष्ठ लिपीक	३३	प्रमुख लिपिक वरिष्ठ लिपिक यांना नेमणूक दिलेल्या कामकाजामध्ये त्यांच्या आदेशाच्या अधीन राहून काम पूर्ण करण्यास सर्वतोपरी मदत करणे आवक जावक मराठी इंग्रजी संगणकीय टंकलेखन तसेच इतर कामकाज मुदत पूर्ण करणे

नियम क्र. ४ (१)(ख) (तीन)

निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती,तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायीत्व प्रणाली.

निर्णय घेण्याच्या पध्दती:-

शासन /पोलीस महासंचालन यांचे कार्यालयाकडुन प्राप्त झालेले किंवा या वरिष्ठ कार्यालयांनी ठरवुन दिलेले परिपत्रकाच्या अधीन राहुन या कार्यालयास प्राप्त होणा-या प्रकरणांचा निपटारा केला जातो किंवा त्या प्रकारणाबाबत योग्य तो निर्णय घेतला जातो.

पर्यवेक्षण :-

शहरात कायदा व सुव्यवस्थेबाबतचे कामकाज वाचक शाखेमार्फत करणे, प्रशासकीय कामकाजाचे प्रशासकीय अधिकारी पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय, स्वीय सहाय्यक, आणि या कार्यालयातील इतर अधिकारी /कर्मचारी यांचे मार्फत पर्यवेक्षण करणे तसेच या कार्यालयातील सर्व शाखाअंतर्गत चालणा-या कामकाजाचे कार्यालय अधीक्षक यांचे मार्फत पर्यवेक्षण करणे.

उत्तरदायित्व :-

शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलीस आयुक्त हे त्यांचे अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांना वेळोवेळी योग्य ते मार्गदर्शन, सूचना देऊन शांतता अबाधित ठेवतात. तेथील गुन्हेगारीवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करून सर्व प्रकारच्या गुन्हेगारीवर प्रतिबंधक नियंत्रण ठेवणे. शहराअंतर्गत कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे प्रशासकीय कामकाज वेळेवर पार पाडण्याबाबत योग्य ती कार्यवाही करणे. त्याप्रमाणे सर्व कार्यपद्धती वरिष्ठ कार्यालयाशी योग्य समन्वय साधुन अशा प्रकारचे उत्तरदायित्व या कार्यालयाचे आहे .

नियम क्र. ४ (१)(ख) (चार) ठरविण्यात आलेली मानके

लिपिक वर्गीय कर्मचा-यांच्या कामाचे दैनंदिन पर्यवेक्षण करुन त्यांच्याकडून वेळेत कामाची पुर्तता करून घेणे.
२. प्रमुख लिपिक आणि कनिष्ठ लिपिक यांच्या कामाचा कार्यालयीन अधिक्षक यांनी दर आठवडयाला आढावा घेऊन प्रकरणांचा निपटारा वेळेत होत असल्याची खात्री करणे.

३. प्रत्येक महिन्यास कार्यालयीन अधिक्षक यांनी प्रमुख लिपिक, कनिष्ठ लिपिक यांची पोलीस आयुक्त यांच्यासोबत बैठक घेऊन चर्चा करणे व कामकाजाचा आढावा घेणे. अहवाल पाठविण्याचा नियमित आढावा घेणे वरिष्ठांना माहिती सादर करणे.
४. वाचक शाखेत गुन्ह्यांचे माहितीबाबत दैनंदिनरित्या पाठपुरावा करणे साप्ताहिक, पंधरवडयाला व मासिक अहवाल वेळोवेळी पाठविणे. अहवाल पाठविण्याचा नियमित आढावा घेणे वरिष्ठांना माहिती सादर करणे.

नियम क्र. ४ (१)(ख) (पाच)

कर्मचा - यांनी त्यांचे कामकाजाचे निर्मुलन करण्यासाठी वापरावयाचे 'नियम, अटी, निर्देश पुस्तिका आणि अभिलेख

पोलीस आयुक्तालयाचे कामकाज हे महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग १,२,३ प्रमाणे चालते फौजदारी स्वरूपाच्या गुन्हयांचे कामकाज भारतीय दंड संहिता कलमान्वये चालते. या व्यतिरिक्त मोटार परिवहन अधिनियमान्वये मुंबई पोलीस ॲक्ट, वित्तीय व कोषागार नियमावली तसेच वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे कामकाज चालते. कार्यालयात शासकीय आदेश, परिपत्रके, राजपत्रक यांची नस्ती अदययावत ठेवली जाते.

पिंपरी चिंचवड पोलीस दलाची कर्तव्य पार पाडण्याकरिता उपलब्ध असणारे नियम/अधिनियम/सुचना/मॅन्युअल/अभिलेख.

१. भारतीय न्याय सहिंता २०२३
२. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३

अ.क्र	कामाचे स्वरूप	कामाचे टप्पे	अपेक्षित कालावधी	प्रत्येक कामाबाबत आणि प्रत्येक टप्प्यावर कर्मचारी व अधिकारी यांची भुमिका आणि जबाबदारी	शेरा असल्यास
१	आस्थापनेवरील पोलीस अधिकारी /कर्मचारी शासकीय वाहने ,शासकीय इमारती, अटक आरोपी, कार्यालयीन खर्च इत्यादी विषयी लेखाविषयक देयके पारित करून संबंधितांना अदा करणे इत्यादी.	प्रकरण निहाय	नियमानुसार	प्रशासकीय अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली लेखापाल व लेखाशाखेतील लिपिकवर्गीय यांची देयके प्राप्त होताच परिक्षण करुन कोषागारात पाठवुन पारित करून संबंधितांना अदा करणे.	
२	आस्थापनेवरील पोलीस अंमलदारांच्या नेमणुका पदोन्नती, बदल्या, विभागीय चौकशी, दंडात्मक कार्यवाही व सेवा अभिलेख अपडेट-उपस्थित ठेवणे.	प्रकरण निहाय	नियमानुसार	प्रशासकीय अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली आस्थापना शाखेतील लिपिक वर्गीय यांनी संबंधित अभिलेख प्रकरणनिहाय वरिष्ठांकडे सादर करून अभिलेख अदययावत नोंदी घेवुन व्यवस्थित ठेवणे इत्यादी.	
३	पत्रव्यवहार शाखेतील पोलीस अधिकारी, लिपिकवर्गीय कर्मचारी व वर्ग ०४ कर्मचारी यांच्या बदल्या, रजा, निवास वाटप, इमारत दुरुस्ती, नवीन कार्यालय प्रस्ताव, मोटार वाहन दुरुस्ती, इंधन देयकाचे अर्ज, चौकशी, पोलीस कल्याणकारी योजना सेवा अभिलेख सुव्यवस्थित ठेवणे.	प्रकरण निहाय	नियमानुसार	प्रशासकीय अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली पत्र व्यवहार शाखेचे लिपिक व आस्थापना शाखेचे लिपिक वर्गीय यांनी संबंधित अभिलेख प्रकरण निहाय वरिष्ठांकडे सादर करून अभिलेख अद्यावत करुन नोंदी घेऊन व्यवस्थित ठेवणे नवीन प्रस्ताव पाठविणे व पाठपुरावा करणे इत्यादी.	
४	विशेष शाखेतील विविध धार्मिक उत्सव, राष्ट्रपुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी , पारपत्र पडताळणी, वर्तणुक अहवाल व अचानक किंवा प्रस्तावित कायदा व सुव्यवस्था संबंधी निवडणुकीचे संबंधिचे बंदोबस्त, संप, मोर्चे, धरणे, परदेशी नागरिकांची माहिती अदययावत ठेवणे. यावर देखरेख ठेवुन शहराअंतर्गत सुरक्षा अति महत्त्वाच्या व्यक्तीचे दौरे इत्यादी.	प्रकरण निहाय	नियमानुसार	पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुरक्षा व अधिपत्याखालील कर्मचारी, विशेष शाखा पोलीस कर्मचारी हे संभाव्य घटनांच्या अनुषंगाने बंदोबस्त लावण्याच्याकामी मनुष्यबळ, कायदा व सुव्यवस्था बंदोबस्त शांततेत पार पाडण्यासाठी बंदोबस्त स्कीम तयार करून शहरातील पोलीस अधिकारी व कर्मचारी, पोलीस स्टेशन अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून बंदोबस्त चोखपणे करून घेणे इत्यादी.	

३. भारतीय साक्ष अधिनियम २०२३
४. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१
५. मोटार वाहन अधिनियम १९८८
६. मोटार वाहन चलन अधिनियम २०१७
७. माहीती तंत्रज्ञान अधिनियम २०००
८. रेल्वे अधिनियम १९८९
९. लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२
१०. कामाचे ठिकाणी महीलांची लैंगिक छळवणुक करण्यास प्रतिबंध अधिनियम २०१३
११. माहीती अधिकार अधिनियम २००५
१२. स्थावर संपदा अधिनियम २०१६
१३. अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९
१४. बालकांची देखभाल व संरक्षण अधिनियम २०००
१५. गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५
१६. शस्त्र अधिनियम १९५९
१७. महाराष्ट्र (मुंबई) दारूबंदी अधिनियम १९४९
१८. भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८
१९. नागरी हक्क सरंक्षण अधिनियम १९५५
२०. महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम १८८७

२१. महाराष्ट्रसंघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९
२२. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६
२३. सिगारेट व इतर तंबाखु उत्पादने अधिनियम २००३
२४. महाराष्ट्र हॉटेल, उपहारगृहे आणि मदयपान कक्ष यामधील अश्लिल नृत्यावर प्रतिबंध घालणेबाबत व महीलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम २०१६
२५. महाराष्ट्र भिक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९५९
२६. महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबधाचे संरक्षण अधिनियम १९९९
२७. महाराष्ट्र लॉटरी आणि बक्षीस स्पर्धा अधिनियम १९५८
२८. महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ठ व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समुळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३
